१११५९६

जा. क्र. एच. एस/पीडी-९/शाखाबदल/९९-२००० \
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, \
पुणे.-१ याचे कार्यालय \
दिनांक:- 21 SEP 1999

प्रति, \
प्राचार्य \
संत तुकाराम माध्यमिक व उच्च माध्यमिक \
विद्यालय लोहगाव ता- हवेली पुणे

विषय :- कनिष्ठ महाविद्यालय प्रथम/द्वितीय वर्षाचे नवीन मंजूर वर्गाचे एका शाखेतून अन्य शाखेत रुपांतर करण्यास परवानगी ......

संदर्भ :- —

वरील संदर्भांकित पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण केलेल्या विनंतीनुसार १] इ.१२वी वाणिज्य (पु) या शासन मान्य वर्गाचे इ.१२वी कला वाणिज्य संयुक्त वर्गामध्ये रुपांतर करण्यास खालील अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

१] वर न कळविल्याप्रमाणे आपण रुपांतर न केल्यास यापूर्वी मंजूर असलेल्या शासन मान्य वर्ग चालविण्याची आपली जबाबदारी राहील.

२] वर कळविल्याप्रमाणे वर्गाचे रुपांतर करुन वर्ग चालविताना असल्यास कनिष्ठ महाविद्यालया च्या कोणत्याही शाखेचा वर्ग चालविण्यास शासनाने विहित केलेल्या अटींची उदा आवश्यक शै. पात्रतेचा शिक्षक वर्ग, इमारत पुरेशी शैक्षणिक व भौतिक सुविधा, सरासरी हजेरी इ. अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर परवानगी दिलेली आहे.

३] मंजूर वर्गाचे वर कळविल्याप्रमाणे रुपांतर केल्यास स्थानिक ठिकाणी किंवा परिसरातील कोणत्याही अन्य संस्थेच्या मंजूर वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होऊन शैक्षणिक स्पर्धा निर्माण होऊ नये तसेच रुपांतर केल्याने आपल्या संस्थेतील मंजूर शिक्षक कर्मचाऱ्यावर त्याचा परिणाम होऊन अतिरिक्त शिक्षक होणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

असे झाल्यास वरील दिलेली मान्यता आपोआप रद्द होऊन यथापूर्वी असलेली मूळ शासन मान्यता चालू राहील याची कृपया नोंद घ्यावी.

मा. शिक्षण उपसंचालक यांनी मान्य केलेल्या \
टिपणीनुसार

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक \
यांची स्वाक्षरी आहे.

(स्वाक्षरी) \
शिक्षण उपसंचालक, \
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रतिलिपी

१] मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जि. प. पुणे/रायगड /अहमदनगर /सोलापूर यांना माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी

२] मा. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सादर

338/99-2000 \
28/9/99